ePaper

**येत्या दोन दिवसात पुन्हा राजकीय भूकंप होणार: उदय सामंत**



| वर्ष - 6 । अंक - 310 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- पुण्यातील भाषणात अजित पवारांची तुफान फटकेबाजी
- रेकॉर्डब्रेक... ६४५ कोटींची वसुली!
- उजनीचा कालवा फुटला


www.mahaenews.com | शनिवार ,दि. 25 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# लोकशाहीची लक्तरे!

## निवडणुकीत पैशाचा वारेमाप वापर : 14 लाखांची रोकड जप्त

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूकीसाठी नेमण्यात आलेल्या स्थिर संनियंत्रण पथकास (स्टॅटिक सर्व्हेलंस टीम) आज दुपारी दळवीनगरमधील भाजीमंडई परिसरात एका वाहनात सुमारे १४ लाख रुपयांची रोख रक्कम आढळून आली आहे. यापूर्वीही सुमारे ४५ लाख रुपयांची रोकड जप्त केल्याचे वृत्त होते. त्यामुळे मतदारांना प्रभावित करण्यासाठी पैशाचा वारेमाप वापर सुरू असून, त्याद्वारे लोकशाहीची लख्तरे तोडली जात आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली आचारसंहिता कक्षाचे प्रमुख आबासाहेब ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली एसएसटी पथकाने ही कामगिरी केली आहे. या पथकाद्वारे निवडणूक कालावधीमध्ये बेकायदेशीर वस्तू, मद्य ताडी इत्यादींची वाहतूक, रोख रकमेची वाहतूक, शस्रास्त्रे अशा बाबींवर देखरेख ठेवण्यात येत आहे.चिंचवड मधील दळवीनगर परिसरात या पथकाद्वारे तपासणी करत असताना दळवीनगर परिसरात एका खाजगी वाहनातून १४ लाख रुपयांची रोकड या पथकास आढळून आली. याबाबत निवडणूक आयोगाच्या नियमानुसार तात्काळ आयकर विभागास कळविण्यात आले. त्यानंतर आयकर विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पुढील कारवाईसाठी संबंधित व्यक्ती, वाहन आणि आढळून आलेली रोख रक्कम पंचनामा करुन आयकर विभागाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. एसएसटी पथकाद्वारे चिंचवड विधानसभा मतदारसंघात विविध भागात वाहनांची तपासणी करण्यात येत असून २४X७ हे पथक कार्यरत आहे. या पथकाद्वारे धडक कारवाई करण्यात येत असून आचारसंहिताभंगाबाबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याद्दष्टीने बारकाईने नजर ठेवली जात आहे. हे पथक नाका, चेकपोस्ट अशा ठिकाणी तपासणी करीत आहे. या पथकामार्फत मतदानापूर्वी शेवटच्या ७२ तासात कामकाज अधिक बळकट करण्यात आले आहे. मतदारांवर बेकायदेशीररित्या प्रभाव टाकणे, त्यांना प्रेरित करणे या गोष्टींवर आळा घालण्याची महत्वाची जबाबदारी या पथकावर आहे.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचा अंमल सुरु असून कोणत्याही प्रकारे या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सर्व सबंधित पथकांनी घ्यावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी दिले आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार खपवून घेतला जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही श्री.ढोले यांनी दिला आहे. तसेच या कालावधीत मतदान केंद्र परिसर आणि मतदान केंद्राच्या आतील भागात कोणत्याही प्रकारची अग्नीशस्त्रे, हत्यारे बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व कायदेशीर कर्तव्य बजावत असलेल्या इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे.

### मतदान परिघात आचार सहिंता लागू...

**२०५ – चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम सुरू असून २६ फेब्रुवारी रोजी मतदार होणार आहे. या अनुषंगाने मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी निर्बंध लागू केले आहेत. चिंचवड मतदार संघातील पिंपरी -चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील चिंचवड, सांगवी, वाकड, हिंजवडी, देहूरोड, रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ८७ इमारतीतील ५१० मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पडावे, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहोचू नये आदींसाठी निर्बंध लागू करण्यात आले आहेत. मतदानाचा दिवस २६ फेब्रुवारी रोजी ००.०१ वा. ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार या कालावधीत मतदान केंद्राच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरातील टपऱ्या, स्टॉल, दुकाने, वाणिज्यिक आस्थापना आदी तत्सम बाबी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

# अश्विनी जगताप यांनी शेवटचा दिवस गाजवला!

## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : महायुतीकडून घरोघरी प्रचार

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी सांगवी तसेच पिंपळेगुरवमध्ये घरोघरी जाऊन नागरिकांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशी संवाद साधून कमळ चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन केले. पिंपळेगुरवच्या जनतेने एक लाखाचे मताधिक्य देण्याचे वचन अश्विनी लक्ष्मण जगताप यांना दिले.**



भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी पिंपळेनिलखमध्ये पदयात्रा काढत प्रचाराची राळ उडवत शेवटचा दिवसही गाजवला. या पदयात्रेत तरूण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पिंपळेनिलखच्या नागरिकांनी पदयात्रेचे जल्लोषात जंगी स्वागत केले. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी मतदारसंघात आजपर्यंत केलेल्या विकासकामाला मत द्या. त्यांची विकासाची परंपरा कायम ठेवण्यासाठी बळ द्या, असे आवाहन दोघांनी मतदारांना केले. भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले गट), राष्ट्रीय समाज पक्ष, रयत क्रांती संघटना, शिवसंग्राम संघटना व प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे. घरोघरी जाऊन त्यांनी जास्तीत जास्त नागरिकांशी संवाद साधला आहे. प्रत्येक भागात त्यांनी पदयात्रा व कोपरा सभा घेत भाजपला साथ देण्याचे आवाहन केले आहे. प्रचारात प्रत्येक ठिकाणी त्यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी आतापर्यंत केलेल्या विकासाला मत द्या, असेच आवानह केले आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशीही त्यांनी सांगवी, पिंपळेगुरवमध्ये घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधला.

### पदयात्रेला तरुणाईची उदंड गर्दी उसळली...

चिंचवड मतदारसंघाच्या निवडणुकीची जबाबदारी असलेले निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी पिंपळेनिलखमध्ये भव्य पदयात्रा काढली. काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष सचिन साठे यांनी गुरूवारी भाजपमध्ये प्रवेश करताच दुसऱ्याच दिवसांपासूनच ते अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारात सक्रिय झाले. शंकर जगताप यांच्या पदयात्रेला तरुणाईची उदंड गर्दी उसळली होती. कमळ फुलू दे च्या घोषणाबाजीने संपूर्ण पिंपळेनिलख दणाणून गेले होते. शंकर जगताप यांनी घरोघरी नागरिकांशी संवाद साधला. ज्येष्ठांचे आशिर्वाद घेतले. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी केलेली विकासकामे नागरिकांना सांगितली. त्यांनी केलेल्या विकासाला एक मत देऊन भाजपला मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.

# रेकॉर्डब्रेक... 645 कोटींची वसुली!

## » कर संकलन विभागाची कारवाई : सहायक आयुक्त निलेश देशमुख यांची माहिती

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाकडून थकित मालमत्ता कर वसूलीची जोरदार मोहीम सुरू आहे. कर संकलन विभागाने आत्तापर्यंतच्या इतिहासात कर वसुलीचा उच्चांक गाठला आहे. गुरूवारअखेर 645 कोटी कराची वसुली झाली आहे. गतवर्षी 31 मार्च 2022 ला 632 कोटी वसुली झाली होती, अशी माहिती कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.**

शहरात 5 लाख 92 हजार मिळकती आहेत. कर संकलन व कर आकारणी विभागाने चालू वर्षात 1000 कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासून म्हणजेच 1 एप्रिल 2022 पासून 23 फेब्रुवारीपर्यंत 645 कोटींचा कर वसुल झाला असून उदिष्टांपेक्षा पालिका 350 कोटी रुपयांने मागे आहे. आतापर्यंत तीन लाख साठ हजार मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. अडीच लाख मालमत्ताधारकांकडे कराची थकबाकी आहे. या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सुमारे एकच महिना बाकी असल्याने वसुली मोहीम कडक करण्यात आली आहे. त्यानुसार 5000 नवीन अधिपत्रे काढण्यात आली आहेत. याचबरोबर, ज्या मालमत्ताधारकांकडे चार वर्षांपेक्षा जास्त काळापासून मूळ कराची थकबाकी एक लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा मालमत्ताधारकांची नावे वर्तमानपत्रासह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पुढील सोमवारपासून विविध दैनिकात ही यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

या थकबाकीदारांमध्ये निवासी मालमत्ताधारक, कंपनी, संस्था, व्यावसायिक आदींचा समावेश आहे. आतापर्यंत तब्बल सहाशेपेक्षा जास्त मालमत्ता जप्त तर दोनशेपेक्षा जास्त मालमत्तांचे नळ कनेक्शन तोडले आहे. महापालिकेच्या अंतर्गत एकूण 17 झोन येतात.

सर्व झोनमध्ये वसुलीची मोहीम सुरू आहे. ही मोहीम अधिक तीव्र करण्यासाठी पालिकेने वसुली पथकामधील कर्मचारी संख्या, एमएसएफ जवानांची संख्या वाढविली आहे. दरम्यान, 2018 मध्ये 471 कोटी 6 लाखांचा कर वसुल झाला होता. त्यानंतर दरवर्षी सातत्याने कर वसुली वाढतच आहे. 2022-23 या आर्थिक वर्षांत 23 फेब्रुवारीअखेर 645 कोटींचा उच्चांकी कर वसुल झाला आहे.




> “ कर संकलन व कर आकारणी विभागाने चालू आर्थिक वर्षात 1000 कोटीचे उद्दिष्ट ठेवले आहे. या आर्थिक वर्षात आणखी 350 कोटींच्या वसुलीचे लक्ष्य आहे. वारंवार आवाहन करुन देखील मोठे व्यावसायिक, कंपन्या थकीत मालमत्ता कर भरण्यास पुढे आलेल्या दिसत नाहीत. त्यामुळे विभागाने वसुली मोहीम कडक केली असून झिरो टॉलरन्स पॉलिसी धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे आता कोणत्याही संस्था, कंपन्या, थकबाकीदारांबाबत पालिकेकडून सहिष्णुता दाखविण्यात येणार नाही.
>
> – **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

---

# रॅलीद्वारे नाना काटे यांच्या प्रचाराचा समारोप

## » चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : महाविकास आघाडीची संपूर्ण ताकद पणाला

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘नाना काटे, आगे बढो, हम तुम्हारे साथ है’, ‘येऊन येऊन येणार कोण? नानांशिवाय आहेच कोण’, शीतलताई आगे बढो, हम तुम्हारे साथ है’ अशा विविध घोषणा देत शुक्रवारी काढण्यात आलेल्या रॅलीने चिंचवड मतदारसंघ दणाणून गेला होता. माजी नगरसेविका तथा महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या सुविद्य पत्नी शीतल काटे यांनी शुक्रवारी पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरातील विविध भागातून काढलेल्या रॅलीला महिलावर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मतदारसंघाच्या विकासासाठी नाना काटेंनाच निवडून आणण्याचा निर्धार या रॅलीत सहभागी झालेल्या महिलाशक्तीने केला.**



या रॅलीत शीतल काटे यांच्यासमवेत आमदार निलेश लंके, माजी नगरसेवक शंकर काटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस नगर जिल्हाध्यक्ष घनश्याम शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते, हे खरंच असावं. कारण नाना काटे यांच्या पाठीमागे नव्हे तर त्यांच्या खांद्याला खांदा देऊन त्यांच्या पत्नी नगरसेविका शीतल काटे काम करत आहेत. एक स्त्री जसे आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची काळजी घेते, तसेच शीतल काटे आपल्या प्रभागातील प्रत्येक स्तरातील नागरिकांच्या अडी अडचणी सोडवतात. मग आता त्यांना आम्ही पाठिंबा देणारच, अशी भावना यावेळी महिलावर्गाने व्यक्त केली.

### महिलांचा लक्षणीय प्रतिसाद...

» शीतल काटे यांनी महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी विविध उपक्रम राबविले. बचतगटाच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वयंरोजगाराची संधी मिळवून दिली. त्यांच्या अथक प्रयत्नांनी पिंपळे सौदागर परिसरातील महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनल्या. याशिवाय युवतींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण, व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. नाना काटे आणि शीतल काटे हे उभयंता त्यांच्या प्रभागासारखेच संपूर्ण चिंचवड मतदारसंघाचाही कायापालट करतील, याची आम्हाला खात्री असल्यामुळेच आम्ही नाना काटे यांनाच प्रचंड मते देऊन निवडून आणणार असल्याचे या रॅलीतील महिलांनी सांगितले.

## संपादकीय »

### ग्रामसभेच्या ‘गावा’ जावे!

***एका बाजूला हक्कांसाठी आक्रमक झालेले जागरूक आजोबा तर दुसऱ्या बाजूला ग्रामविकासासाठी तळमळीने बोलणारे तरुण आणि त्याचवेळी ‘कधी राग कधी अनुराग’ अशी भूमिकेतून वातावरणात समतोल राखणारे नेते असा विविधरंगी अनुभव नुकताच एका ग्रामसभेत घेतला!***

ग्रामसभा म्हणजे केवळ तक्रारींचा पाऊस नाही तर तळमळीने बोलणाऱ्यांचे सक्रिय व्यासपीठ असाच काहीसा संदेश मिळाला! गटविकास अधिकाऱ्यांनी एका ग्रामसभेसाठी संपर्क अधिकारी म्हणून माझी निवड प्रजासत्ताकदिनी केली.सकाळी साडेनऊची ग्रामसभा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सव्वाअकराला सुरू झाली. दोन तास चालली. विधायक, सकारात्मक चर्चेबरोबरच जबरदस्त खडाजंगीही अनुभवली. मी सुद्धा काही काळ ग्रामसेवक होतो. तथापि इतकी जबरदस्त ग्रामसभा कधी अनुभवली नव्हती. एक आजोबा आक्रमकपणे बोलत होते. ग्रामपंचायत अधिनियमाचे भले मोठे पुस्तकच त्यांनी आणले होते. पान क्रमांकसह अधिनियम सांगत होते. कौतुक वाटले. परंतु नियम आणि प्रशासकीय अडचणींबाबतीत ऐकूनच घेत नव्हते. नंतर ते शांत झाले. ग्रामसभा संपल्यानंतर त्यांच्या घराजवळचे गटार त्यांनी मला आग्रहाने नेऊन दाखवले. ग्रामसभा सुरू असताना त्यांच्या या प्रश्नावर, ‘प्रक्रिया चालू आहे. निधी मिळाल्याबरोबर आपले काम करण्यात येईल’, असे सांगण्यात आले.तीन-चार तरुण मुले शाळा, रस्ते याबद्दल तळमळीने बोलत होती. त्यांचे काही मुद्दे चुकत होते. परंतु ते ऐकून घेत होते, हे महत्त्वाचे! ‘तालमीचे लाईटचे बिल कोण देणार’ अशी विचारणा कुस्तीगीर वस्तादांनी केली. त्यांची इच्छा होती की, ग्रामपंचायतीनेच बिल द्यावे. एक ग्रामपंचायत सदस्य म्हणाले, “मी लाईटचे बिल भरतो. पुढची बॉडी येईल, त्या बाबतीत मी काही सांगू शकणार नाही. परंतु सध्या मी भरतो.” मला त्यांच्या दातृत्वाचे कौतुक वाटले. बिलाचे प्रश्‍न मांडणारे गृहस्थ नंतर शांत झाले. लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या खिशातले पैसे खर्च करून एखाद्या समस्येवर तोडगा काढावा हे नवलच होते.घरकुलाबाबतचा विषय निघाल्यावर ग्रामस्थांमधील गैरसमज स्पष्ट झाले. ‘त्याला घरकुल मिळाले, मग मला का नाही?’ अशी तक्रारवजा शंका मांडणारेही कमी नव्हते. जाणीवपूर्वक काहींना घरकुल देत नाही का? असा त्यांचा प्रश्न होता. तथापि, प्राधान्यक्रम असतात. एकदा निवड झाल्यावर जसे उद्दिष्ट येईल तसे घरकुल दिले जाते. ग्रामपंचायत अथवा ग्रामसेवक त्यात आडकाठी आणत नाहीत, असे सांगितले. तालुक्याचे उद्दिष्ट आणि मंजूर घरकुले यांची संख्या सांगितली. घरकुलासाठी त्वेषाने बोलणारा मुलगा शांत झाला.



भूमिका

# उच्च शिक्षणातील समतेचे आव्हान



देशात विद्यापीठे व महाविद्यालये मोठ्या प्रमाणात असली, तरी गुणवत्तेच्या बाबतीत फारच मोजक्या विद्यापीठांना व संस्थांना उंची गाठता आली आहे. गुणवत्ता वाढवणे हे विद्यापीठे व महाविद्यालयांपुढील आजचे सर्वांत मोठे आव्हान आहे. चांगल्या गुणवत्तेची व चांगल्या पायाभूत सुविधांची, गुणवान शिक्षक असलेली विद्यापीठे व महाविद्यालये असतील, तरच गुणवान तरुण-तरुणी घडतील. देश, समाज आणि कुटुंबांच्या प्रगतीसाठी ती योगदान देऊ शकतील. देशाचा विकास हा मनुष्यबळाच्या गुणात्मक विकासावर अवलंबून आहे, हे सरकार, समाज आणि संस्थाचालकांना समजायला हवे. आजची गुंतवणूक उद्याची कसदार पिढी व भवितव्य घडवीत असते, हे लक्षात घ्यायला हवे. शिक्षणाबाबत तशी धोरणे आखायला हवीत आणि जीडीपीच्या सहा टक्के इतकी गुंतवणूकही करायला हवी. गुणवान व कसदार मनुष्यबळ हवे असल्यास, कसहीन शिक्षण देऊन चालणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य नाही का? बड्या, भव्यदिव्य इमारती बांधायच्या आणि गुणवत्तेचे तीनतेरा वाजवायचे, यातून काहीच साध्य होणार नाही. नव्या पिढीला किरकोळ संशोधन सुविधा, पगार, अपात्र शिक्षक, तकलादू आणि सत्त्वहीन शिक्षण देऊन अशा शिक्षणसंस्था, बघे सरकार सामाजिक व राष्ट्रीय गुन्हाच करीत आहेत. आपण देशाच्या भवितव्याशी खेळतो आहोत, याचे भान जितक्या लवकर सर्व घटकांना येईल, तितके चांगले!

भारतीय उच्च शिक्षणचा मोठा विस्तार झाला असला, तरी ते समाजातील सर्व स्तरांतील तरुणांना समानतेने मिळत नाही. तिथेही जाती व्यवस्थेसारखी उच्च-नीचतेची उतरंड आहेच. काही सरकारी व काही खासगी विद्यापीठे - संस्था चांगल्या आहेत; तिथे मोजक्यांनाच प्रवेश मिळतो. इतरांना ती संधी मिळत नाही, हे वास्तव आहे. समाजातील उच्चभ्रू व श्रीमंत वर्गास उत्तम शिक्षण आणि बाकीच्यांना कमी दर्जाचे शिक्षण, हा भेदाभेद का असावा? चांगले शिक्षण हा गोरगरीब व मध्यमवर्गीय घरातील तरुणांचा अधिकार नाही काय? आपण अजूनही उच्च शिक्षणासाठी समान संधी निर्माण करू शकलेलो नाही. खेड्यापाड्यांतील खुल्या संवर्गातील गरीब मुलेही उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. ते उच्च शिक्षणात यावेत व टिकावेत, यासाठी सरकारने शिष्यवृत्ती सुरू करायला हवी. मुस्लिम समाजातील गरीब विद्यार्थी वर्गासही ती द्यायला हवी. सरकारने या दिशेने पावले टाकायला काय हरकत आहे?

देशातील ७८ टक्के महाविद्यालये खासगी आहेत. यातील पाच ते १० हजारांवर विद्यार्थी असणाऱ्या सक्षम संस्थाचालकांनी निवडक १०० गरीब व हुशार मुलांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीद्वारे नि:शुल्क शिक्षण दिले, तर काय बिघडणार आहे? याला मी एज्युकेशनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (ईएसआर) असे म्हणतो. देशातील त्या त्या राज्यांतील सर्वच उद्योगपतींनी गरीब व हुशार मुलांसाठी शिष्यवृत्ती द्यावी. आजच्या काळात सक्षमांनी अक्षमांना आधार देणे, ही खरी देशभक्ती ठरेल. देशभक्तीचे सार्वजनिक प्रदर्शन करण्यापेक्षा हे नक्कीच योग्य ठरेल. उच्च शिक्षण हे मानवाच्या उत्थानाचे माध्यम आहे. मानवाच्या सुप्त क्षमतांचा विकास करण्यासाठी आणि त्यांचा समाजहितासाठी उपयोग करण्यासाठी उच्च शिक्षणासारखे अन्य माध्यम नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा उच्च शिक्षण क्षेत्रात अवधी २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि एक लाख विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. गेल्या ७५ वर्षांत विद्यापीठांची संख्या १०४३, तर महाविद्यालयांची संख्या ३९,९३१वर पोहोचली आहे.

स्वतंत्रपणे कार्य करणाऱ्या ११,९२३ उच्च शिक्षण संस्था आहेत

## वृद्धांची संख्या वाढते आहे, ‘वृद्धमित्र’ कधी वाढणार?

**साधारण ६०-६५ वर्षे वयापुढचा काळ हा वृद्धावस्था म्हणून गणला जातो. शरीराची कार्यक्षमता आणि इजा किंवा झीज भरून काढण्याची क्षमता कमी होऊ लागते तेव्हा जरण सुरू होते आणि वाढत्या वयाची लक्षणे दिसू लागतात.**

भारतातील वाढत्या लोकसंख्येनुसार वृद्धांची संख्या लक्षात घेता २००१ साली सुमारे १०२ कोटी ८८ लाख लोकसंख्येपैकी ७ कोटी १० लाख व्यक्ती वृद्धावस्थेत होत्या, तर २०५० सालाच्या सुमारास हीच संख्या ३२ कोटी, म्हणजे त्या वेळच्या अपेक्षित लोकसंख्येच्या (१५३ कोटी) जवळजवळ २१ टक्के असेल. कुटुंबनियोजन, आरोग्यविषयक सुधारणा आणि दीर्घकालीन रोगांवर नियंत्रण यामुळे अपेक्षित आयुर्मान जसे उंचावेल, तसे एकूण वृद्धांचे प्रमाण वाढतच जाईल.

वृद्धावस्थेकडे सामाजिकदृष्ट्या तसेच वैद्यकीयदृष्ट्या निराळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. वयाची साठी ओलांडली की, आरोग्याचे प्रश्न तुलनेने कमी होतात, पण निवृत्तीनंतर कौटुंबिक, आर्थिक प्रश्न उभे ठाकतात. साधारण सत्तरीपुढील वयात उमेद कमी होऊ लागते, शारीरिक प्रश्न वाढू लागतात, व्याधी वाढून कदाचित संपूर्ण परावलंबित्व आलेले असू शकते. या सर्व वयोगटांमध्ये स्वभावातील बदल, एकटेपण व त्यामुळे



मानसिक आणि भावनिक प्रश्नही डोके वर काढू लागतात.

ज्येष्ठांसोबत काम सुरू केले तेव्हा या उपक्रमाचे नाव काय ठेवावे, यावर बरीच चर्चा झाली. त्यांच्यामध्ये काम करताना लक्षात आले की, वृद्धांना आमच्यात एक मित्र सापडतो. तिथून ‘वृद्धमित्र’ ही संकल्पना पुढे आली. पुण्यातील दोन वस्त्यांपासून वृद्धमित्रांचे काम सुरू झाले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेसमोर, या प्रकल्पासंदर्भातील सादरीकरण करण्यात आले. महानगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. कोविडकाळात वृद्धमित्रांचे काम पुण्यातील इतर वस्त्यांमध्येही सुरू करण्यासंदर्भात महानगरपालिकेने पत्र काढले आणि परवानगी दिली. दळवी रुग्णालय आणि सोनवणे रुग्णालयात ‘जेरियाट्रिक युनिट’ सुरू करण्यासाठी जागा दिली. आता या दोन्ही रुग्णालयांत वृद्धांना विनामूल्य फिजिओथेरपी दिली जाते. समाजाकडून, कुटुंबाकडून दुर्लक्षित वृद्धांच्या शारीरिक, मानसिक आणि कौटुंबिक गरजा ओळखून त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. काही वृद्ध घरी एकटेच राहतात. त्यांच्याशी बोलायला कोणीच नसते. त्यांना बाहेर फिरून यावेसे वाटले, तरी सोबत कोणीही नसल्यामुळे ते एकटे बाहेर पडू शकत नाहीत. अशा परिस्थितीत वृद्धमित्र अपेक्षित सर्व मदत करतात, आधार देतात. त्यांना एकटेपणा वाटणार नाही याची काळजी घेतात. बाहेर फिरवून आणणे, त्यांच्याशी त्यांना आवडेल अशा विषयावर गप्पा मारणे असे शक्य ते सर्व प्रयत्न करतात. वृद्धमित्र कार्यक्रमांतर्गत वृद्धांसोबत काम सुरू करताना त्यांच्या प्राथमिक गरजा आणि राहणीमान समजून घेताना काही माहिती गोळा केली असता आतापर्यंत ६३ टक्के महिला आणि ३७ टक्के पुरुष आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उजनीचा कालवा फुटला!

## भिंत कोसळली, जबाबदार कोण? एकाच उपअभियंत्याकडे 3-3 विभागांचा पदभार

। सोलापूर । महाईन्यूज ।

**मोहोळ तालुक्यातील पाटकूल हद्दीतील उजनीचा डावा कालवा फुटून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना नुकतीच घडली. जलसंपदा विभागाकडे अधिकारी-कर्मचाऱ्यांची कमतरता हेच मुख्य कारण यामागे असल्याचे सांगण्यात येते. कालव्यांच्या देखभाल, दुरुस्तीच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह उभे आहे. हा प्रकार होण्यामागे आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीची जबाबदारी कोणाची हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तातडीने पदभरती न झाल्यास भविष्यात असे प्रकार होण्याची नामुष्की ओढवेल.**



कालव्यातील गाळ काढण्याचे काम तीनवेळा झाल्याची सरकार दप्तरी नोंद झाली आहे. परंतु, तीनवेळा काम होऊनही कालव्याची क्षमता का वाढली नाही? आता पुन्हा नव्याने या कालव्याच्या दुरुस्तीसाठी सरकारकडून जलसंपदा विभागासाठी कोट्यवधींचा निधी मिळेल. मग आता तरी हे काम दर्जेदार होऊन त्याची क्षमता वाढविणारे ठरेल का? कोट्यवधींचा हा खर्च सत्कारणी लागावा व उजनीचे कालवेही सक्षमच व्हावेत इतकीच अपेक्षा आहे.

सध्यातरी पाटकूलजवळील वाहून गेलेला डावा कालवा दुरुस्तीचे काम अजूनही सुरुच आहे. कालवा दुरुस्तीचे काम पूर्ण कधी होणार, या भागातील शेतकऱ्यांना हक्काचे रोटेशनचे पाणी कधी मिळणार? शेतकऱ्यांचे झालेले नुकसान कधी भरून मिळणार? गाळाने भरलेल्या विहिरी, मोटारींचे नुकसान, वाहून गेलेली शेततळी, फळबागा, पिकांचे झालेले नुकसान हे मन हेलावणारे विदारक दृष्य दिसते आहे. जमिनीचे सपाटीकरण करणे, पुन्हा नव्याने आपल्या जमिनीची मशागत करणे ही आव्हाने या शेतकऱ्यांसमोर आहेत. सुमारे ३०० हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेल्याचा अंदाज होता.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने पंचनामे केले गेले. उजनीचा डावा कालवा फुटल्याच चौकशी करण्यासाठी समिती नेमली गेली. समितीने चौकशीही केली. त्याचा अहवालही वरिष्ठांकडे पाठविण्याचे सोपस्कर झाले. परंतु, या समितीने नेमकी चौकशी काय केली? त्यातून निष्पन्न काय झाले? या समितीच्या कार्यकक्षा काय होत्या? हे प्रश्नही तसे अनुत्तरीतच आहेत. भविष्यात कॅनॉलच्या कामासाठी नव्या दमाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची गरज भासणार आहे. सरकार पातळीवर याबाबीचा गंभीरपणे विचार करावा लागेल. कालवा फुटून झालेल्या नुकसानीचे परिणाम शेतकऱ्यांनाच भोगावे लागत आहेत, याचाही विचार होण्याची गरज आहे.पंढरपूर येथील घाटावरील भिंत पावसामुळे कोसळली. हा नैसर्गिक की मानवनिर्मित अपघात होता, याची चौकशी झाली नाही. परंतु, या कोसळलेल्या भिंतीखाली सहाजणांचा बळी गेला.

### कामाच्या गुणवत्तेचा ताळमेळ कसा?

» गेल्या तीन वर्षात जलसंपदा विभागाने देखभाल, दुरुस्तीवर किती खर्च केला? या प्रश्नाचे उत्तर मिळेल ते आकड्यात... परंतु, प्रत्यक्षात केलेले काम व त्याची गुणवत्ता याचा ताळमेळ मात्र कसा बसवणार हा प्रश्न पुन्हा अनुत्तरीत राहील. जलसंपदा विभागाच्या एका कार्यकारी अभियंत्यास सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे, त्याची कारणमीमांसा कशी करणार? जलसंपदातील तीन-तीन विभागांचा पदभार एकाच उपअभियंत्याकडे आहे. एका अधिकाऱ्याकडे किती पदभार असावेत, याला काहीही फूटपट्टी लावलेली नाही. मनुष्यबळ कमी असल्यानेच हा प्रकार होत आहे.

---


## १९ बंगले घोटाळा प्रकरणी

# ठाकरेंच्या अडचणी वाढणार?

### » ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून ग्रामपंचायती अधिकाऱ्यांविरोधात तक्रार

। कोर्लई । महाईन्यूज ।

**राज्यात सत्तासंघर्षावरून राजकारण तापलेले असतानाच 19 बंगल्यांच्या कथित घोटाळा प्रकरणी उद्धव ठाकरे यांच्या अडचणीत पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. याप्रकरणी ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून ग्रामपंचायती अधिकाऱ्यांविरोधात तक्रार दाखल केली आहे, यामध्ये सरकारी रेकॉर्डमध्ये खाडोखोड करुन फसवणूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.**



दरम्यान या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. तसेच ग्रामपंचायत सदस्यांची चौकशी केली जाईल. तसेच हे मुळ १९ बंगले कोणाचे आहेत. याचा ठाकरेंशी संबंध आहे का याचा शोध घेतला जाईल.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या बंगल्याशी उद्धव ठाकरेंशी संबंध असल्याचा आरोप केला जात आहे. यादरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या चौकशीतून काही माहिती समोर आली तर ठाकरे कुटुंबाकडून देखील माहिती घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न केले जातील. यामुळे उद्धव ठाकरे आणि कुटुंबियांच्या अडचणी वाढू शकतात.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी रायगड जिल्ह्यातील कोर्लईत उद्धव ठाकरे यांनी संपत्ती घेतली आहे. या संपत्तीचा हिशोब ठाकरे कुटुंबाला द्यावा लागेल, याचा पुनरुच्चार भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.

सोमय्या यांनी कोर्लईतील 19 बंगल्यांच्या कथित घोटाळा प्रकरणी ग्रामविकास अधिकारी, बीडीओवर रेवदंडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच एफआयआर क्रमांक 26, IPC SECTIONS 420, 465, 466, 468 आणि 34 नुसार हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सोमय्या यांनी ट्वीट करत याबद्दलची माहिती दिली आहे.

मुरुडच्या ग्रामविकास अधिकारी संगिता लक्ष्मण भांगरे यांनी कोर्लई ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरुद्ध फसवणूक तसेच 19 बंगल्याच्या रेकॉर्डमध्ये खाडाखोड करणे, अशी तक्रार रेवदंडा पोलीस स्टेशन येथे नोंदवली आहे अशी माहिती सोमय्या यांनी दिली आहे.

### 19 बंगल्याच्या रेकॉर्डमध्ये खाडाखोड

**» मुरुडच्या ग्रामविकास अधिकारी संगिता लक्ष्मण भांगरे यांनी कोर्लई ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरुद्ध फसवणूक तसेच 19 बंगल्याच्या रेकॉर्डमध्ये खाडाखोड करणे, अशी तक्रार रेवदंडा पोलीस स्टेशन येथे नोंदवली आहे अशी माहिती सोमय्या यांनी दिली आहे.**

---

# अखेर शिक्कामोर्तब! औरंगाबाद झालं आता छत्रपती संभाजीनगर!

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

महाराष्ट्रातील औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन शहरांच्या नामांतराचा मुद्दा अखेर निकाली निघाला आहे. कारण राज्य शासनाच्या नामांतराच्या प्रस्तावाला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे.

त्यामुळं आता औरंगाबादचं नामांतर 'छत्रपती संभाजीनगर' तर उस्मानाबादचं नामांतर 'धाराशीव' असं झालं आहे. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विटद्वारे दिली आहे. त्यांनी म्हटलं, "राज्य सरकारच्या निर्णयाला केंद्र सरकारची मंजुरी! पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मंत्री अमितभाई शाह यांचे कोटी-कोटी आभार. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वातील सरकारनं करुन दाखविले..."



### फक्त शहराचं नाव बदललं जिल्ह्याचं नाव कायम


**» केंद्राच्या आदेशानुसार, औरंगाबाद जिल्ह्याच्या मुख्यालयाचं नाव छत्रपती संभाजी नगर करण्यात आलं आहे. पण औरंगाबाद जिल्ह्याचं नाव कायम राहणार आहे. तर उस्मानाबाद जिल्ह्याच्या मुख्यालयाचं नाव धाराशीव असं बदलण्यात आलं आहे. पण उस्मानाबाद जिल्ह्याचं नाव कायम ठेवण्यात आलं आहे.**

# कर्नाटकात काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी लढाई, विकासासाठी भाजपच!

## विकास हवा असेल, तर त्यांनी भाजपाला मतदान करावं, अमित शाह यांचे आवाहन

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आज कर्नाटक दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी कर्नाटकातील लोकांना संबोधित केलं. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवण्याचं आवाहन अमित शाह यांनी केलं. दरम्यान, याचवेळी कर्नाटकात काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी लढाई सुरू असल्याचं सांगत शाहांनी काँग्रेसवर निशाणा साधला.**



अमित शाह हे बेल्लरीच्या संदूरमधील भाजपाच्या विजय संकल्प समावेश कार्यक्रमाला संबोधित करत होते. यावेळी त्यांनी कर्नाटक काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री पदासाठी सुरू असलेल्या अंतर्गत कलहाची खिल्ली उडवली. काँग्रेस आणि जेडी(एस) हे पक्ष भ्रष्टाचार आणि घराणेशाहीने बरबटलेले आहेत. असे पक्ष कर्नाटकच्या विकासासाठी कधीही काम करू शकत नाहीत. येथील लोकांना जर विकास हवा असेल, तर त्यांनी भाजपाला मतदान करावं, असं आवाहन अमित शाह यांनी केलं.

२०१९ मध्ये काँग्रेस आणि जेडी (एस) च्या युतीचं सरकार स्थापन झालं आणि भ्रष्टाचाराला सुरुवात झाली. काँग्रेस आणि जेडी (एस) हे घराणेशाहीकडून चालवले जाणारे पक्ष आहेत.



कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री पदासाठी सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांच्यात अंतर्गत कलह सुरू आहे. इतरही बरेच नेते मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक आहेत. त्यामुळे कर्नाटकचा विकास होणार नाही. यासाठी मोदी हेच एकमेव पर्याय आहेत, असं अमित शाह म्हणाले.

### कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री पदासाठी अंतर्गत कलह


**» २०१९ मध्ये काँग्रेस आणि जेडी (एस) च्या युतीचं सरकार स्थापन झालं आणि भ्रष्टाचाराला सुरुवात झाली. काँग्रेस आणि जेडी (एस) हे घराणेशाहीकडून चालवले जाणारे पक्ष आहेत. कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री पदासाठी सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांच्यात अंतर्गत कलह सुरू आहे. इतरही बरेच नेते मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक आहेत. त्यामुळे कर्नाटकचा विकास होणार नाही. यासाठी मोदी हेच एकमेव पर्याय आहेत, असं अमित शाह म्हणाले.ईपीएफओ प्रादेशिक कार्यालयामध्ये अर्ज करावा लागेल.**

# 54 गायींचा मृत्यू, ३० गंभीर

## कणेरी मठात धक्कादायक घटना

।कोल्हापूर। महाईन्यूज ।

कणेरी मठावर सुरू असलेल्या पंचमहाभूत लोकोत्सवात तब्बल 54 गायींचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तब्बल 30 गायी गंभीर आहेत.त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. शिळे खाऊ घातल्यानं गायींचा मृत्यू झाल्याची चर्चा सुरु असल्याची प्राथमिक माहिती आहे. कोल्हापुरातील कणेरी मठावर सध्या पंचमहाभूत लोकोत्सव सुरू आहे. यासाठी देशातून हजारो नागरिक येथे येत असून, येथे जनावरांचं प्रदर्शन देखील भरवण्यात आलं आहे. मठावर भव्य अशी गायींची गोशाळा देखील आहे. या गोशाळेतील गायींना शिळे अन्न खाऊ घातल्याने मठातील तब्बल ते 54 गायींचा मृत्यू झाला आहे. मोठ्या प्रमाणावर गायींचा मृत्यू झाला असून 30 गायी गंभीर असून, त्यांच्यावर गोशाळेमध्ये उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, मठाकडून माहिती लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न होत असून, लाखो करोडो रुपये खर्चून मठावर सुरू असलेल्या पंचमहाभूत लोकोत्सवाला या कारणामुळे गालबोट लागलं आहे. कोल्हापुरातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या टीमकडून रात्रीपासून गायींवर उपचार सुरू आहेत. मात्र, मृत झालेल्या गायींचा अधिकृत आकडा सांगण्यास पशुवैद्यकीय अधिकारीदेखील तयार नाहीत. मृत गायींचे पोस्टमार्टम करून त्याचा तपास केला जाणार असून, मठाकडून माहिती लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न होत असून, लाखो करोडो रुपये खर्चून मठावर सुरू असलेल्या पंचमहाभूत लोकोत्सवाला गालबोट लागलं आहे.



### पंचमहाभूत लोकोत्सवाला या कारणामुळे गालबोट

**»मोठ्या प्रमाणावर गायींचा मृत्यू झाला असून 30 गायी गंभीर असून, त्यांच्यावर गोशाळेमध्ये उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, मठाकडून माहिती लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न होत असून, लाखो करोडो रुपये खर्चून मठावर सुरू असलेल्या पंचमहाभूत लोकोत्सवाला या कारणामुळे गालबोट लागलं आहे.**

दरम्यान एका ठिकाणी हजारो भाकरी चपात्यांचा ढीग लागला असल्याचेदेखील दिसून येत असून, अन्न वाया जाऊ नये याकरिता हे सर्व येथील गायींना खाऊ घालण्यात येत आहे. हा सर्व प्रकार काल रात्रीपासून घडत असून, मृत झालेल्या अनेक गायींना पुरण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांनी हजेरी लावली होती.

# दिल्ली महापालिकेत तुफान हाणामारी!

## भाजप-आपचे नगरसेवक एकमेकांना भिडले

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

दिल्ली महानगर पालिका पुन्हा एकदा मारहाणीचा अड्डा झाला आहे. स्थायी समितीच्या निवडणुकीमध्ये आज भाजप आणि आम आदमी पार्टीचे सदस्य एकमेकांना भिडले.

दोन्ही गटांचे नगरसेवक एक-दुसऱ्याला बुक्क्यांनी मारहाण करत होते, एकमेकांचे केस ओढत होते. आज स्टँडिंग कमिटी निवडणुकीसाठी मतदान झालं. या निवडणुकीदरम्यान थेट मारहाण झाली. यावेळी दुसऱ्यांदा काउंटिंगची मागणी करण्यात आली होती. याच मुद्द्यावरुन भाजप आणि आपचे नगरसेवक समोरासमोर आले.

माजी महापौर आणि विद्यमान नगरसेवक कमलजीत शेहरावत यांनी आरोप केला की, नवनियुक्त महापौर शैली ओबेरॉय ह्या दिल्ली निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांचं आणि निगम सचिव कार्यालयातील अधिकऱ्यांचं म्हणणं ऐकून घेत नव्हत्या. अधिकाऱ्यांनी मतगणना केली परंतु ओबेरॉय काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थिती नव्हत्या. त्यामुळे भाजप नगरसेवक संतापले. फेरमतमोजणीला महापौरांनी नकार दिल्याने हा राडा झाला.




### फेरमतमोजणीला महापौरांनी नकार

**» माजी महापौर आणि विद्यमान नगरसेवक कमलजीत शेहरावत यांनी आरोप केला की, नवनियुक्त महापौर शैली ओबेरॉय ह्या दिल्ली निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांचं आणि निगम सचिव कार्यालयातील अधिकऱ्यांचं म्हणणं ऐकून घेत नव्हत्या. अधिकाऱ्यांनी मतगणना केली परंतु ओबेरॉय काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थिती नव्हत्या. त्यामुळे भाजप नगरसेवक संतापले. फेरमतमोजणीला महापौरांनी नकार दिल्याने हा राडा झाला.**

# अखेर इतक्या वर्षांनी योग आला..

'होणार सून मी या घरची' आणि 'अग्गं बाई सासूबाई' या मालिकेमधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री तेजश्री प्रधान सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. अत्यंत थोड्या कालावधीतच तेजश्रीला लोकांचे भरभरून प्रेम मिळाले.

तेजश्रीने आजवर अनेक चित्रपटात काम केले आहे. 'बबलू बॅचलर' या हिंदी चित्रपटामध्ये देखील तेजश्रीने काम केले. तेजश्रीने नुकतीच सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने मुंडवळ्या बांधून नवरीच्या वेशातील फोटो शेयर केला आहे. तिच्या या फोटोमुळे आता चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. तेव्हा जाणून घेऊया नेमकं काय आहे हे प्रकरण..





तेजश्री गेली 15 वर्षांहून अधिक काळ मनोरंजन विश्वात कार्यरत आहे. आजवर तिने अनेक दिग्गज कलाकारांबरोबर काम केले आहे. तेजश्री लवकरच तिच्या नव्या प्रोजेक्टची घोषणा करणार आहे. मात्र त्याआधी तिनं एक पोस्ट शेअर करत सर्वांना मोठा धक्काच दिला आहे.

या पोस्ट मधील तिचा फोटो पाहून वाटेल की तिचं लग्न झालं की काय पण तसं नाहीय. हा फोटो 12 वर्षांपूर्वीचा आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्या सोबतचा हा फोटो असून तिने जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे.





# 'तो अमराठी असला तरी..' मराठमोळ्या प्राजक्ताचा लव्हइंट्रेस्ट विषयी मोठा खुलासा


प्लॅनेट मराठी या ओटीटी प्लॅटफॉर्मवर 'पटलं तर घ्या' हा चॅट शो नुकताच सुरु झाला आहे. यामध्ये नवीन एपिसोडमध्ये प्राजक्ता माळी आणि या दोन मराठीतल्या सुप्रसिद्ध अभिनेत्रींनी हजेरी लावली होती. यावेळी शो ची होस्ट जयंतीनं प्राजक्तावर लग्नाविषयी अनेक गुगली प्रश्नांचा मारा केला. तेव्हा बोलता-बोलता प्राजक्तानं आपल्या लव्ह इंट्रेस्टविषयी मोठा खुलासा करत खळबळ उडवून दिली आहे.प्राजक्ता माळी ही सध्याची मराठीतली चर्चेतील अभिनेत्री आहे. प्राजक्ता साधी शिंकली तरी तिची बातमी सध्या वाऱ्यासारखी पसरते. त्यात ती कोणाशी लग्न करणार यावरनं तर सध्या प्राजक्ता सोडून अनेक जण मतप्रदर्शन करताना दिसत आहेत. नुकतंच प्राजक्तानं तिचे अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांना लग्न करणं गरजेचं आहे का? हा प्रश्न विचारला....त्यानंतर प्राजक्ता लग्न करणार नाही अशा बातम्या व्हायरल झाल्या. पण तेवढ्यात प्राजक्तानं असं काही नाही..तो एक प्रश्न होता..मी लग्न करणार असं म्हणून विषय तिथं संपवला. पण तो विषय संपतोय नाही तोवर आता प्लॅनेट मराठीच्या चॅट शो मध्ये मुलगा अमराठी असला तरी त्याला मी मराठमोळा बनवेन असं म्हणून मॅडमनी नव्या चर्चेला हवा दिली ना...आता सोशल मीडियावर बाईंचं हे विधानही जंगी चर्चा झाडणार यात शंका नाही.

# पंजाबी गाण्यात गौतमीचा धुराळा



**सोशल मीडियावर सध्याच्या घडीला सर्वाधिक लोकप्रिय सेलिब्रेटी कोण असं विचारताच तरुणाईच्या तोंडी गौतमीचे नाव येते. सबसे कातील गौतमी पाटील हे महाराष्ट्राच्या मनोरंजन क्षेत्रातलं सगळ्यात चर्चेतलं नावं आहे. त्याला कारणही तसेच आहे. गौतमीच्या अदांनी, स्टाईलनं चाहत्यांना वेडं केलं आहे.**गेल्या काही दिवसांपासून गौतमी भलतीच चर्चेत आली आहे. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये गौतमीचे मनोरंजनाचे कार्यक्रम होत असून त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. काहींनी तर तिचे कार्यक्रम गावात, शहरात होऊ द्यायचे नाही. अशीही भूमिका घेतली आहे. यामुळे गौतमी आणखी चर्चेत आली आहे. गौतमीचा डान्स हा अश्लील असून त्यामध्ये कुठेही सभ्यपणा नाही. अशी भूमिका नेटकऱ्यांनी आणि काही कलावंतांनी घेतली होती.त्यानंतर गौतमीनं आपल्या एका मुलाखतीमध्ये माफी मागून आपल्याकडून पुन्हा असे प्रकार होणार नाहीत याविषयी सांगितले होते. याशिवाय आपल्याला लावणी येत नसून आपण ती शिकत असल्याची कबूली दिली होती. प्रेक्षकांनी काही प्रमाणात शिस्त पाळली तर बराचसा गोंधळ कमी होईल असेही तिनं सांगितले होते.यापूर्वी गौतमीनं तिच्या एका पोस्टमधून आपलं नवीन गाणं येत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर आता तिचे पंजाबी भाषेतील गाणं आलं आहे. त्याचे बोल तेरा पता असे आहे. या गाण्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

# पुन्हा घुमणार घुंगरांचा आवाज..



अमृता खानविलकरची प्रमुख भूमिका असलेला चंद्रमुखी सिनेमा बॉक्स ऑफिसवर हिट झाला. अमृता खानविलकरच्या लावणीचं, तिच्या अदांचं प्रचंड कौतुक झालं. आदिनाथ कोठारे आणि अमृता खानविलकर यांची लव्हेबल केमिस्ट्री सर्वांना आवडली. आता चंद्रमुखी २ येणार अशी दाट शक्यता आहे. अचानक अशी चर्चा का सुरु झालीय? त्यामागे एक महत्वाचं कारण आहे. सोशल मीडियावर एक फोटो व्हायरल झालाय. या फोटोत प्रसाद ओक, अमृता खानविलकर, मंजिरी ओक आणि चंद्रमुखी सिनेमात ज्याने लावणी कोरिओग्राफ केल्या असा नृत्यदिग्दर्शक आशिष पाटील दिसतोय.

# इंग्लंडच्या ब्रूकने तोडला 30 वर्ष जुना विक्रम!



## ब्रूकने केल्या 9 कसोटी डावांत 800 हून अधिक धावा

। दुबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना विल्मिंग्टन येथे खेळला जात आहे.**

**या सामन्यात इंग्लंडच्या हॅरी ब्रूकने आपल्या झंझावाती कामगिरीच्या जोरावर भारताचा माजी फलंदाज विनोद कांबळीचा वर्षानुवर्षे जुना विक्रम मोडीत काढला आहे.**

ब्रूकने कारकिर्दीच्या सुरुवातीला 9 कसोटी डावांत 800 हून अधिक धावा केल्या आहेत. अशाप्रकारे विक्रम करणारा ब्रूक पहिला खेळाडू ठरला आहे.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडची सुरुवात खराब झाली. सलामीवीर चेक क्रोली अवघ्या 2 धावा करून बाद झाला. यानंतर बेन डकेटने 9 धावा केल्या. ओली पॉप 6 चेंडूत 10 धावा करून बाद झाला. मात्र जो रूट आणि हॅरी ब्रूक यांनी शानदार प्रदर्शन करत सामन्याचं चित्रचं बदलून टाकलं.

हॅरी ब्रूक हा आपल्या कारकिर्दीतील पहिल्या 9 कसोटी डावात 800 किंवा त्याहून अधिक धावा करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. त्याने आतापर्यंत 9 डावात 4 शतके आणि 3 अर्धशतके केली आहेत. यासह 807 धावा झाल्या आहेत.

ब्रूकच्या आधी हा विक्रम कांबळीच्या नावावर होता. त्याने 9 कसोटी डावांमध्ये सर्वाधिक 798 धावा केल्या. यादरम्यान त्याने चार शतके आणि दोन द्विशतके झळकावली होती.

ब्रूकने 800 हून अधिक धावा करून अनेक दिग्गजांना मागे सोडले असून, या यादीत सुनील गावस्कर यांच्या नावाचाही समावेश आहे. गावस्कर यांनी 9 डावात 778 धावा केल्या आहेत. तर, एव्हर्टन वीक्सने 9 डावात 777 धावा केल्या आहेत.

# विराट कोहलीने अलिबागमध्ये खरेदी केला आलिशान बंगला

## कोहलीने अलिबागमध्ये खरेदी केलेली दुसरी मालमत्ता

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहलीने मुंबईतील अलिबागमध्ये एक आलिशान बंगला खरेदी केला आहे. विराट कोहलीने अलिबागमध्ये खरेदी केलेली ही दुसरी मालमत्ता आहे.**



क्रिकेटपटू विराट कोहलीने नुकताच अलिबागमधील आवास गावात एक आलिशान बंगला खरेदी केला आहे. विराट कोहली सध्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत व्यस्त आहे. अशा परिस्थितीत त्यांचा मोठा भाऊ विकास कोहली याने अलिबागमध्ये बंगला खरेदी करण्याची सर्व औपचारिकता पूर्ण केली आहे. विराट आणि अनुष्काची अलिबागमधील पहिली मालमत्ता नाही. या जोडप्याने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अलिबागमध्ये १९.२४ कोटी रुपयांना फार्महाऊस खरेदी केले होते. त्याने १.१५ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क भरल्याची माहिती आहे.

विराट कोहलीने आवास व्हिलेजमधील २,००० चौरस फुटाच्या व्हिलावर ६ कोटी रुपये खर्च केले आहेत. या मालमत्तेवर त्यांनी ३६ लाख रुपये मुद्रांक शुल्क भरले आहे. या व्हिलामध्ये ४०० स्क्वेअर फूटचा स्विमिंग पूलही असल्याचं सांगण्यात येत आहे. बॉलीवूड अभिनेता संजय खानची मुलगी आणि हृतिक रोशनची एक्स पत्नी सुझैन खान हिने या प्रकल्पाचे इंटीरियर डिझाइन केले आहे.

वकील महेश म्हात्रे हे आवास लिव्हिंग अलिबाग एलएलपीचे कायदेशीर सल्लागार म्हणून काम करतात. त्यांनी हिंदुस्तान टाईम्सला सांगितले की, “आवास हे नैसर्गिक सौंदर्यामुळे सेलिब्रिटींचे आवडते ठिकाण आहे. तसेच, मांडवा जेटी आवासपासून पाच मिनिटांच्या अंतरावर आहे आणि स्पीड बोटींनी मुंबईचे अंतर आता फक्त १५ मिनिटांवर आणले आहे.

अहवालानुसार, “अलिबागमधील जमिनीच्या सरासरी किमती सुमारे ३,००० ते ३,५०० रुपये प्रति चौरस फूट आहेत. हे उच्चभ्रू वर्गासाठी एक आवडते वीकेंड डेस्टिनेशन देखील आहे.” फक्त विराट कोहलीच नाही तर भारतीय क्रिकेट संघाचा सध्याचा कर्णधार रोहित शर्मनेही अलिबागमध्ये जमीन खरेदी केली आहे.

रोहित शर्मने २०२१ मध्ये म्हात्रोली गावात चार एकर जमीन खरेदी केली होती.विशेष म्हणजे विराट कोहली क्रिकेटच्या प्रत्येक फॉरमॅटमध्ये त्याच्या उत्कृष्ट फलंदाजीसाठी जगभरात ओळखला जातो. त्यामुळे त्याच्या चाहत्यांची संख्याही मोठी आहे. त्याचबरोबर कोहलीची गणना जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटूंमध्ये केली जाते. कोहलीकडे प्रॉपर्टी व्यतिरिक्त अनेक महागड्या कार देखील आहेत.

# कोच पार्क सांगने सिंधूशी घेतली फारकत!

। टोकियो । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूचे प्रशिक्षक पार्क सांग यांनी सिंधूपासून फारकत घेतली आहे. याबाबत त्यांनी इन्स्टाग्रावर पोस्ट करत माहिती दिली. पार्क आणि सिंधू यांनी 2019 पासून एकत्र काम करण्यास सुरुवात केली होती. पार्क यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधूने BWF WORLD TOUR विजेतेपदं, सईद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धा, स्विस ओपन आणि सिंगापूर ओपन स्पर्धा जिंकली. याचबरोबर सिंधूने राष्ट्रकुल 2022 स्पर्धेत महिला एकेरीत सुवर्ण पदक देखील जिंकले. तर टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक नावावर केले.

पार्क आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हणतात, 'सर्वांनी हेलो मी सर्वांना हेलो म्हणून खूप काळ झाला. मी हैदराबादमध्ये काही दिवसांपूर्वीच परत आलो आहे. ज्यांनी माझ्या वडिलांविषयी काळजी व्यक्त केली त्या सर्वांचे मी आभार मानतो. खरं सांगायचं झालं तर माझ्या वडिलांची प्रकृती अजून चांगली नाही. त्यामुळे मला भारतात परतताना खूप वेदना होत होत्या.' पार्क पुढे म्हणाले की, 'मला सिंधू सोबतच्या सहवासाबाबत बोलायचं आहे.

